# COLLEGE OF ENGINEERING, PUNE

(An Autonomous Institute of Govt. of Maharashtra )

5, Wellesly Road, Near Sangam Bridge, Shivajinagar, Pune - 411 005. INDIA

☎ Off. : + 91 - 20 - 25507010 / 25507310 ● Fax : +91 - 20 - 25507299 ● Email : acco@coep.ac.in


जा.क्र.अमपु/लेखा/ २०२०/ 174 दि. 08 JAN 2020

परिपत्रक

विषय-दुष्काळ परिस्थिती तसेच , "क्यार" व " महा" चक्रीवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतकर-याचे पाल्य असलेल्या विदयार्थ्याचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत सुचना

संदर्भ-१ मा.सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांचे परिपत्रक क्र. तंशिविकापु/विवि/परीक्षा शुल्क/२०१९/४९८३ दि.०३/१२/२०१९

२.मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई.यांचे पत्र क्र. २अ/एडीम/२०१९/८६४ दि.२९/११/२०१९

३ शासन निर्णय क्र.संकीर्ण.एससीवायच-२०१९/प्र.क्र.२२०/म.-७ दि.२१/११/२०१९

४ शासन निर्णय क्र.संकीर्ण.सीएलएस-२०१९/प्र.क्र.१९१/म.-३ दि.१८/११/२०१९

उपरोक्त संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सन २०१९ **दुष्काळ परिस्थिती तसेच , "क्यार" व " महा" चक्रीवादळामुळे आलेल्या** ३२५ तालुक्यातील शेतकर-याचे पाल्य असलेल्या विदयार्थ्याचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयानुसार परीक्षा शुल्क माफी असेल याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

ही परीक्षा शुल्क माफीची योजना केवळ अर्थिकदृष्टया मागास प्रर्वगातील विदयार्थ्यापुरता मर्यादित राहील. राज्याचा अधिवासी असलेल्या व रू ८.०० लक्ष या मयर्दिपर्यंत कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेल्या विधार्थ्यांकरीता लागू राहील.

राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र विदयार्थ्याना या योजनेअंतर्गत ५० टक्के परीक्षा शुल्क अनुज्ञेय राहील.तसेच उर्वरित अर्थिकदृष्टया मागास प्रर्वगातील रू ८.०० लक्ष या मयर्दिपर्यंत कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न असलेल्या विधार्थ्यांकरीता १०० टक्के परीक्षा शुल्क अनुज्ञेय राहील.

**परीक्षा शुल्क माफ सवलत खालील विदयार्थ्यांना लागु असणार नाही.**

अ) ज्या विदयार्थ्याना शासन शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा शुल्क माफीची सवलत उपलब्ध आहे.

ब) जे विदयार्थी त्याच परीक्षेस दुस-यांदा बसले असतील.

क) जे विदयार्थी बहिस्थ(External) म्हणुन नोंदले असतील.

ड) ज्या विदयार्थ्याचे पालक शहरात प्रत्यक्ष राहतात.नोकरी धंदा करतात परंतु त्यांच्या नावे गावी शेतजमीन आहे.

इ) एम टेक चे जे विदयार्थी विदयावेतनचे लाभार्थी आहेत अश्या विदयार्थ्याना.

वरील बाब विचारात घेता संस्थेच्या सर्व विदयार्थ्याना सुचित करण्यात येते कि सदर सवलतीस पात्र विदयार्थ्यानी आवक जावक विभागाकडे(Inward-Outward Section) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लेखी अर्ज व त्या पृष्ठयार्थ खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करावयाची आहे.

१ दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी असल्याचा ७/१२ चा सन २०१९-२०२० चा उतारा ( गाव कामगार तलाठी यांच्या स्वाक्षरीचा)

# COLLEGE OF ENGINEERING, PUNE

(An Autonomous Institute of Govt. of Maharashtra )

5, Wellesly Road, Near Sangam Bridge, Shivajinagar, Pune - 411 005. INDIA

☎ Off. : + 91 - 20 - 25507010 / 25507310 ● Fax : +91 - 20 - 25507299 ● Email : acco@coep.ac.in


२ पालकांचा उत्पन्नाचा दाखला (अर्थिक वर्ष २०१८-२०१९ मा.तहसीलदार/यांचे समकक्ष अधिकारी यांनी निर्गमित केलेला दाखला)

३ आधार कार्ड ची छायांकित प्रत

४ सन २०१९-२०२० ची महाविदयालयाची शैक्षणिक शुल्काची छायांकित प्रत

५ एसबीआय बॅकेचे खाते कमांक

६ बंधपत्र( स्वाक्षरीसह)

वरील प्रमाणे अर्ज व त्यासोबत सादर करावयाची कागदपत्रांची अंतिम तारीख २० जानेवारी ... २०२०.आहे.

जे विद्यार्थी दिलेल्या वेळेत अर्ज सादर करणार नाहीत. व परिणामी परीक्षा शुल्क माफी सवलत पासुन वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित विदयार्थ्यांची असेल याची नोंद घ्यावी.

डॉ.भ.भ.आहुजा
**संचालक**
अभियांत्रिकी महाविद्यालय,
पुणे

प्रत- विभागप्रमुख-विद्युत/उत्पादन/अणुविद्युत/धातुशास्त्र/उपकरणीकरण/यंत्र/संगणक व माहीती तंत्रज्ञान/स्थापत्य/प्लॅनिंग/परीक्षा कक्ष /विद्यार्थी विभाग-त्यांनी या आदेशाची प्रत विभागीय सुचना फलकावर लावावी.

# विदयार्थ्यांनी द्यावयाचे बंधपत्र

विदयार्थ्याचे नाव........................................................................................................

**MIS NO.**.......................................................................................................

शै.व.२०१९-२०२० मधील वर्ग व शाखा **(Branch &Year)**.................................

प्रवर्ग.............................. शिष्यवृत्ती सवलत प्रकार..........................................

कायम स्वरूपी रहिवासी पत्ता.......................................................................

..................................ता.........................................जि.........................................

आधार क्रमांक...............................................मोबाईल क्र.........................................

मी................................................................अभियांत्रिकी महाविदयालय पुणे या संस्थेत चालु शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०मध्ये प्रवेशित असुन उपरोक्त दिलेली माहीती ही संपुर्णतः खरी आहे.याची मी हमी देत आहे.परिक्षा अर्ज भरण्यासाठीच्या शासनाने दिलेल्या सर्व अटी व शर्ती( शासन निर्णयक्र..एससीवायच-२०१९/प्र.क्र.२२०/म.-७ दि.२१/११/२०१९व क्र सीएलएस-२०१९/प्र.क्र.१९१/म.-३ दि.१८/११/२०१९) मी वाचलेल्या असुन त्या मला मान्य आहेत.सदर अर्ज भरताना सादर केलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास होणा-या शिक्षेस मी पात्र असेल.

विदयार्थ्याचे नाव व स्वाक्षरी